शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत महाविद्यालयातील पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूंच्या कामगिरीवर परिणाम करणा–या सामाजिक, आर्थिक व मानसिक घटकांचा चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत
शारीरिक शिक्षण या विषयात पीएच.डी.साठी सादर
करण्यात येणा–या शोध प्रबंधाचा
संशोधन आराखडा

संशोधक

राहुल दिलीपकुमार मगदुम

संचालक, शारीरिक शिक्षण, शिवराज कला,
वाणिज्य व ड.स.कदम विज्ञान महाविद्यालय,
गडहिंगलज, ता.गडहिंगलज, जि.कोल्हापूर

मार्गदर्शक

डॉ. राजेश्वर भास्करराव देशमुख

सहायक प्राध्यापक
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
औंढा नागनाथ, जि.हिंगोली.

स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा, विद्यापीठ, नांदेड

जून, 2016

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत महाविद्यालयातील पुरुष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूंच्या कामगिरीवर परिणाम करणा–या सामाजिक, आर्थिक व मानसिक घटकांचा चिकित्सक अभ्यास

I. प्रस्तावना

1. शारीरिक शिक्षणाचे स्वरूपः

आयुष्यात प्रत्येकाल सुख स्वास्थ्य, सुरक्षितता व स्वतःचे संरक्षण करण्यासाठी, मानवाने पूर्वापार शरीराची जोपासना केली आहे. आपण ज्याला शरीर सुदृढ करण्याचे शिक्षण म्हणता त्यालाच शिक्षणक्षेत्रात 'शारीरिक शिक्षण' असे म्हणतात. स्पर्धा म्हणजे नुसते धावणे, पळणे, फेकणे, उड्या मारणे, जोरात चालणे हा हेतू नसून शरीर बलवान करून, व्यक्तीचा विकास करणे, समाजांचे स्वास्थ्य टिकविणे हा मूळ हेतू होता. म्हणूनच हया सामन्यांच्या व स्पर्धांच्या द्वारे बहुसंख्य राष्टांत आपुलकी व स्नेहभाव निर्माण झालेला आढळतो! सर्वांमध्ये खेळाडूवृत्ती निर्माण केली जाते. शारीरिक शिक्षण व्यक्ती समाजाचा विकास करणारे एक साधन आहे. त्या दृष्टीने त्याचा विचार करून, आपल्या विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना त्याचे शिक्षण देउन देशाला प्रगतिपथावर नेणे हाच खरा शारीरिक शिक्षणाबाबतचा मूळ हेतू

आहे. शारीरिक शिक्षण हा सामान्य शिक्षणाचा एक अविभाज्य घटक आहे.

२. शिक्षणात शारीरिक शिक्षणाचे महत्त्वः

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षण तज्ज्ञांनी व सरकारने उच्च ध्येय डोळयांपुढे ठेवून शिक्षणाद्वारे बालकांचे तरुणांचे शरीरसंवर्धन करून राष्टाचे सामर्थ्य, बल, वाढविण्याची किमया करण्याचे ठरवले. अनेक ठिकाणी राष्टीय पातळीवर शारीरिक शिक्षण व क्रीडा यांची महाविद्यालये, सैनिकी महाविद्यालये सुरू करण्यात आली. सेवाभाव, राष्टप्रेम, शिस्त, त्याग इत्यादी गुण जोपासण्यात आले. पुनर्रचनेच्या कार्यात थेट प्राथमिक ते महाविद्यालयापर्यंतच्या शिक्षणात आमूलाग्र बदल करून विद्यर्थ्यांत शारीरिक, बौध्दिक व नैतिक असा सर्वांगिण विकास करणे हे प्रमुख ध्येय ठरवले गेले.

३. शारीरिक शिक्षणाची ध्येये व उद्दिष्टेः

भारताच्या राष्टीय शारीरिक शिक्षण व मनोरंजनाच्या आराखडयात पुढील ध्येये आढळून येतात. शारीरिक शिक्षणाचे असे ध्येये आहे की, आपल्या देशातील शिक्षण घेणारा प्रत्येक मुलगा शारीरिक, मानसिक व भावनात्मकदृष्टया कार्यक्षम झाला पाहिजे व त्याच्यामध्ये वैयक्तिक व सामाजिक विकास झाला पाहिजे.

त्याला समाजात सुखासमाधानाने जीवन जगता आले पाहिजेच त्याचबरोबर तो समाजाचा एक आदर्श नागरिक बनला पाहिजे.

राष्टीय आराखडयात शारीरिक शिक्षणाची खालील उद्दिष्टे आहेत

1. शारीरिक क्षमतेचा विकास करणे.
2. मज्ज व स्नायू यांच्या सहकार्यातून प्राप्त होणा–या कौशल्याचा विकास करणे.
3. व्यक्तिमत्व व चारित्र्यविकास

व्यक्तिमत्व आणि चारित्र्य विकासात पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो,

1. स्वास्थ्य
2. बौध्दिक निर्णयशक्तीचा विकास
3. भावनात्मक विकास
4. मनोरंजन
5. व्यावसायिक क्षमता
6. शीलसंवर्धन

4. मैदानी खेळ ॲथलेटिक्सः

ॲथलेटिक्स स्पर्धामध्ये धावणे, शर्यती, उड्या व फेकी या बाबींचा समावेश होतो. या स्पर्धामध्ये साधारणपणे 100 ते

1000 पर्यंत खेळाडू भाग घेत असतात. खेळाडूंची संख्या जितकी जास्त असेल तितका उत्साह खेळामध्ये येतो. क्रीडांगणावर खेळाडू असतात व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रेक्षक क्रीडांगणाबाहेर उपस्थित असतात. एकाच वेळी धावणे, शर्यत, उडीचा प्रकार व फेकीचा प्रकार क्रीडांगणावर चालू असतो. एका पाठोपाठ एक निरनिराळ्या प्रकारचे खेळाडू आपापल्या स्पर्धामध्ये भाग घेत असतात. ॲथलेटिक्स क्रीडा मध्ये व्यक्तिगत किंवा सामुहिक खेळाडूच्या कामगिरीवर भर देण्यात आली तरी प्रत्येक खेळाडूच्या कामगिरीवर सामाजिक, आर्थिक व मानसिक सतराचा परिणाम प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या जाणवतो.

5. सामाजिक, आर्थिक व मानसिक स्तर

सामाजिक, आर्थिक व मानसिक स्तरामुळे निर्माण होणारी परिस्थिती क्रीडा समाजाच्या दृष्टीने घातक असते. ती परिस्थिती मुळातच क्रीडा विश्वासाठी अयोग्य असते. कारण क्रीडा विश्वावर या परिस्थितीचा घातक परिणाम होत असतो. सामाजिक, आर्थिक व मानसिक परिणाम या एखाद्या व्याधीसारखे असतात. व्यक्ति विकासाला व क्रीडा समाजाला त्या मारक ठरतात. खेळाडूच्या मनात एक प्रकारची असुरक्षितचा व चिंता निर्माण

करतात. सामाजिक, आर्थिक व मानसिक परिणाम खेळाडूच्या आशा–आकांक्षा पूर्तीच्या मार्गात अडथळे निर्माण करतात.

प्रत्येक समाजात सामाजिक, आर्थिक व मानसिक स्तर अस्तित्व आढळून येत असले तरी त्याचे स्वरूप मात्र सारखे नाही. प्रत्येक समाजात त्याचे स्वरूप भिन्न आढळते. परिस्थितीनुसार, काळानुसार व पिढीनुसार सामाजिक आर्थिक स्तरांस्तरांमध्ये बदल होत जाते. सामाजिक, आर्थिक व मानसिक स्तराचे स्वरूप सार्वत्रिक असले तरी त्याची तिव्रता भिन्न असते.

सामाजिक, आर्थिक व मानसिक स्तर या विघटित सामाजिक आर्थिक परिस्थितीतूनच निर्माण होतात व त्या एकमेकांशी संबंधीत असतात. एखाद्या स्तराचा आपण स्वतंत्रपणे विचार करीत असलो तरी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या सर्व सामाजिक, आर्थिक व मानसिक स्तर एकमेकांशी जोडलेल्या असतात. म्हणून संशोधक कोणतेही संशोधन करताना त्याचा विचार स्वंतत्रपणे करू शकत नाही. भारतात मात्र सामाजिक, आर्थिक व मानसिक स्तराचे स्वरूप दिवसेंदिवस जटील होत चालले असुन याचे परिणाम क्रीडा क्षेत्राला जास्त प्रभावित करणारे आहे.

वर्तमान परिथितीत सामाजिक, आर्थिक व मानसिक कारणामुळे खेळाडूचा क्रीडामधील सहभाग कमी होत असल्याचे दिसुन येत आहे. पर्यायाने या खेळाडूंचा शारीरिक, मानसिक, बौध्दिक व आर्थिक, विकास कमी होतो. याचा परिणाम खेळाडूंच्या आरोग्यावर, सामाजिक विकासावर व एकात्मतेवर होतो. खेळ खेळण्याचे प्रमाण हे पुर्णतः सामाजिक, आर्थिक व मानसिक बार्बीवर अवलंबून असते. आजही ग्रामीण खेळाडूची वाढ व विकास ही शहरी खेळाडूपेक्षा नगण्य राहिली आहे.

६. संशोधनाचा विषय

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत महाविद्यालयातील पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूंच्या कामगिरीवर परिणाम करणा–या सामाजिक, आर्थिक व मानसिक घटकांचा चिकित्सक अभ्यास

७. संशोधनाचे उद्‌दिष्टे

१. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूचे सामाजिक स्तर तपासणे.

२. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूचे आर्थिक स्तर तपासणे.

३. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूचे मानसिक स्तर तपासणे.

४. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूचे व्यक्तीमत्व आणि यशस्विता यांचा अभ्यास करणे.

5. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरीवर सामाजिक स्तराचे परिणामांचा अभ्यास करणे.

6. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरीवर आर्थिक स्तराचे परिणामांचा अभ्यास करणे.

7. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरीवर मानसिक स्तराचे परिणामांचा अभ्यास करणे.

8. महिला ॲथलेटिक्स खेळाडूचे सामाजिक स्तर तपासणे.

9. महिला ॲथलेटिक्स खेळाडूचे आर्थिक स्तर तपासणे.

10. महिला ॲथलेटिक्स खेळाडूचे मानसिक स्तर तपासणे.

11. महिला ॲथलेटिक्स खेळाडूचे व्यक्तीमत्व आणि यशस्विता यांचा अभ्यास करणे.

12. महिला ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरीवर सामाजिक स्तराचे परिणामांचा अभ्यास करणे.

13. महिला ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरीवर आर्थिक स्तराचे परिणामांचा अभ्यास करणे.

14. महिला ॲथलेटिक्स खेळाडूच्या कामगिरीवर मानसिक स्तराचे परिणामांचा अभ्यास करणे.

८. संशोधनाची परिकल्पनाः

1. सामाजिक दृष्टया पुरूष ॲथलेटिक्स खेळाडू मध्ये विविधता आहे.
2. आर्थिक दृष्टया पुरूष ॲथलेटिक्स खेळाडू मध्ये विविधता आहे.
3. मानसिक दृष्टया पुरूष ॲथलेटिक्स खेळाडू मध्ये विविधता आहे.
4. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूचे व्यक्तीमत्व व यशस्विता यांच्यात परस्परपुरक संबंध आहे.
5. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूंच्या कामगिरीवर सामाजिक स्तराचा परिणाम होतो.
6. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूंच्या कामगिरीवर आर्थिक स्तराचा परिणाम होतो.
7. पुरूष ॲथलेटिक्स खेळाडूंच्या कामगिरीवर मानसिक स्तराचा परिणाम होतो.
8. सामाजिक दृष्टया महिला ॲथलेटिक्स खेळाडू मध्ये विविधता आहे.
9. आर्थिक दृष्टया महिला ॲथलेटिक्स खेळाडू मध्ये विविधता आहे.

10. मानसिक दृष्ट्या महिला ॲथलेटिक्स खेळाडू मध्ये विविधता आहे.

11. महिला ॲथलेटिक्स खेळाडूचे व्यक्तीमत्व व यशस्विता यांच्यात परस्परपुरक संबंध आहे.

12. महिला ॲथलेटिक्स खेळाडूंच्या कामगिरीवर सामाजिक स्तराचा परिणाम होतो.

13. महिला ॲथलेटिक्स खेळाडूंच्या कामगिरीवर आर्थिक स्तराचा परिणाम होतो.

14. महिला ॲथलेटिक्स खेळाडूंच्या कामगिरीवर मानसिक स्तराचा परिणाम होतो.

9. परिक्षेत्र, व्याप्ती व मर्यादाः

1. मुख्य परिक्षेत्रः शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत मैदानी स्पर्धेत प्रामुख्याने भाग घेणा–या महाविद्यालयातील 400 खेळाडूंच्या (पुरूष–200 व महिला–200) अभ्यास केला जाईल.

2. निष्कर्ष उपयुक्त विशेषतः प्रत्येक पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडू पर्यंत राहिल व सर्वसाधारण ॲथलेटिक्स खेळाडूला उपयुक्त ठरेल.

३. सामाजिक, आर्थिक व मानसिक स्तर तपासणी व त्याचे खेळाडूच्या कामगिरीवर परिणाम समजण्यास मदत होईल.

II. संदर्भ साहित्याचा आढावा

करमरकर (२०१२):

मोहालीचा कपील देव व झारखंडचा महेद्रसिंग धोनी या गरिबीतुन वर आलेल्या धडपडणा-या युवकांच्या नेतृत्वाखालील भारत विश्वचषक जिंकू शकला आहे. तळागाळाच्या मुलांमध्ये वर येण्याची महत्वकांक्षा असते, जिद्द असते, महाराष्ट्राचा क्रीडा विकास वेगाने व्हायचा असेल तर तो खालून वर झाला पाहिजे.

शेट्टी (२०१२):

कोणत्याही खेळाडूला आर्थिक विवंचना नसेल तर तो शांतचित्ताने आपल्या खेळाकडे लक्ष एकाग्र करू शकतो आणि म्हणूनच खेळाडूंना आर्थिक स्थैर्य मिळणे अत्यावश्यक आहे. राष्ट्रीय स्तरावर खेळणा-या खेळाडूंना मासिक विशिष्ट मानधन मिळण्याची व्यवस्था असायला हवी. याशिवाय दर्जेदार खेळ करणा-या खेळाडूकरिता नोक-यांची उपलब्धता होणेही तितकेच महत्वाचे आहे.

III. प्रकरण तिसरेः संशोधन पध्दती

1. संशोधनाचे स्थानः

1. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हे आहेत.
2. तिन्ही जिल्हयातील एकूण 279 महाविद्यालये आहेत.

2. नमुना निवडः ॲथलेटिक्स मधले सगळे खेळप्रकार हया संशोधनासाठी निवडण्यात येईल. तसेच पुरूष व महिला ॲथलेटिक्स खेळाडूच्या निवडसाठी स्तरित यादृच्छिक नमुना पध्दत निवडण्यात येईल.

3. चलः भटनागर व इतर (1987) व फालदू (2009) यांनी सामाजिक, आर्थिक व मानसिक चलांसाठी उपयोग केलेली संशोधन प्रक्रिया उपयोगात आणली जाईल.

अ. सामाजिक परिस्थिती चल

ब. आर्थिक परिस्थिती चल

क. मानसिक परिस्थिती चल

ड. व्यक्तीमत्व चल

इ. स्वातंत्र चलः आंतर महाविद्यालयीन ॲथलेटिक्स पुरूष व महिला खेळाडूची सामाजिक, आर्थिक व मानसिक परिस्थिती

4. सांख्यकीय तंत्रः सर्वेक्षण संशोधन पध्दतीः

सर्वेक्षणात्मक पध्दतीच्या आधारे प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन, विश्लेषण व आर्थनिर्वचन करण्यासाठी मध्यमान, प्रमाण विचालन गुण संख्या संबंध (Coefficient of co-relation) टी परीक्षण (‘t’ test) या सांख्यिकीय विश्लेषण SPSS (A Software Statement Package) च्या सहाय्याने करण्यात येईल.

प्रबंधाची जुळणीः

संपूर्ण संशोधन प्रबंधाची जुळणी एकूण 5 प्रकरणांत येणार आहे.

1. प्रकरण पहिलेः प्रस्तावना
2. प्रकरण दुसरेः संशोधन साहित्याचा आढावा
3. प्रकरण तिसरेः संशोधन पध्दती
4. प्रकरण चौथेः सांख्यकीय विश्लेषण आणि अन्वयार्थ
5. प्रकरण पाचवेः निष्कर्ष, सुचना व शिफारशी.

संदर्भ सूचीः

ऐनापुरे राजा, *आपले शारीरिक शिक्षण मर्दानी व मैदानी स्पर्धा,* मे. आदर्श विद्यार्थी प्रकाशन, 2012 पुणे.

Bhatnangar, D.P., Pl. Singal and H.K. Grover (1987). Somatomatric variables and obdy componentism in NSNIS, notibag, Patiala, 10 (3) : 35-47.

क–हाडे, बी.एम. शास्त्रीय संशोधन पध्दती, 3री आवृत्ती, पिपळापुरे ॲण्ड कं. पब्लिर्शस, 2011 नागपूर.

करमकर, वि. वि. *हृदयनाथ मगेशकरांची शंका खरी ठरली मान्यताप्राप्त अहवाल कवडीमोलचा,* एक्स्प्रेस टावर्स, नरिमान पॉईटं,मुंबई, दैनिक मराठी लोकसत्ता, ४ जाने., २०१२, पृ. क्र. १२.

Ramesh A. Faldu (2009). *Influence of socio-economic status on physical sfitness of tribal and non tribal college male students*, Asian J. Phy. Edum. I Comp. Science, Asian J. Comp. Science in sports, 1(1) : 129-134.

सांगलीकर, व्ही.एन. व पी.डी.कुलकर्णी, *मैदानी खेळ ॲथलेटिक्स, शर्यती, उड्या व फेकी*, अंबा प्रकाशन, सुधारित आवृत्ती 1997 कोल्हापूर.

शेट्टी गणेश. *खेळाडूंना आर्थिक स्थैर्य मिळायला हवे.*, एक्स्प्रेस टावर्स, नरिमान पॉईटं, मुंबई, दैनिक मराठी लोकसत्ता, ८ जाने., २०१२, पृ. क्र. १२.

संशोधक

प्रा.राहुल दिलीपकुमार मगदुम

संचालक,
शारीरिक शिक्षण, शिवराज कला,
वाणिज्य व ड.स.कदम विज्ञान
महाविद्यालय, गडहिंगलज,
ता.गडहिंगलज, जि.कोल्हापूर.

मार्गदर्शक

डॉ. राजेश्वर भास्करराव देशमुख

सहायक प्राध्यापक,
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, औंढा नागनाथ,
जि.हिंगोली.